# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे  इतिवृत्तांत

दिनांक २५-०२-२०१०

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## १५/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२५) इतिवृत्त

दि.१५/२/२०१० रोजी मा.सभापती **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे सायं. ५.४० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(सिडको), नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री.रविकांत काशीनाथ गवळी
०२. श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०३. श्री. सुरे सिताराम इसराम
०४. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०५. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०६. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०७. श्रीमती मेहरून्नीसा खान
०८. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**संवाद :**

श्रीमती मोमीन सोफिया :सिल्कमिल कॉलनीतील पाणीपुरवठयाच्या कामाची वर्क ऑर्डर झाली काम अद्याप सुरू झाले नाही.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य.अभियंता- ई व फ :वर्क ऑर्डर केंव्हा दिली निश्चित तारीख माहित नाही स.सदस्यांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

मा.सभापती :सर्व सदस्यांना ऐनवेळच्या विषयाची प्रत दयावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान :विषयपत्रिकेवरील व ऐनवेळचे सर्व विषय मंजूर करावे. आचारसंहिता लागणार आहे सर्व विकास कामे तात्काळ वर्क ऑर्डर काढण्याचे आदेशीत करावे काम सुरू करावे.

मा.सभापती :वर्क ऑर्डरसाठी , इतर विकास कामाच्या किती संचिका प्रलंबीत आहे. मुख्यलेखधिकारी व सर्व कार्य.अभियंता यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी :माझेकडील टेंबलवर एकही संचिका पेडींग नाही आलेल्या संचिका लेखापाल, मुख्य लेखाधिकारी असे ३-४ टेंबलवर संचिका जाते. २-३ दिवसाचा कालावधी यात जातो.लेखा विभागातील ९ कर्मचारी १० दिवसापासून निवडणुकीच्या कामासाठी दिले काही संचिका लेखा विभागात असू शकतात.

कार्य.अभि.-ब व क : ए-१ च्या २५-३० बी-१ च्या १०-१२ संचिका असतील ज्या कामाच्या निविदेची कार्यवाही झाली त्या कामाच्या वर्क ऑर्डर निश्चित आचारसंहितेच्या अगोदर होतील.

कार्य.अभियंता-अ व ड :माझे विभागात बी-१ कामाचे २ टक्के रक्कम भरण्याच्या ५ एजन्सीच्या १२ संचिकेचे आदेश देणे बाकी आहे.उदया पर्यत दिले जातील रक्कम भरण्याची आज शेवटची मूदत असून नंतर करारनामा होवून उदया कार्यादेश देण्यात येतील.ए-१ च्या रोजच्या रोज संचिका निकाली काढल्या जात आहे.

कार्य.अभियंता-ई व फ :या विभागाकडील ११ फेब्रुवारी २०१० पर्यत आलेल्या सर्व सचिंका निकाली काढलेल्या आहे.

**विषय क्र. ३९० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५१ (दक्षिण) अंतर्गत गल्ली नं.२२, २३ व २४ इंदिरानगर येथे १००, १५० मी.मी. व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

या भागातील गल्ली नं.२२, २३ व २४ इंदिरानगर येथे ८० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी असून ती फार जुनी असून ए.सी. जलवाहिनी असल्यामुळे ती वारंवार गळती होत असल्यामुळे घाण पाण्याच्या तक्रारी वाढतात. तसेच या जलवाहिनीमधुन पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही. करीता या ठिकाणी १००, १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन २००८-०९ नुसार रक्कम रू.१२,५०,६४१/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे. या कामावर होणारा खर्च सन २००९-१० चे १२ वा वित्त आयोग लेखाशिर्षा मधून करण्यात येणार आहे.

करीता वॉर्ड क्र.५१ (दक्षिण) अंतर्गत गल्ली नं.२२, २३ व २४ इंदिरानगर येथे १००, १५० मीमी व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१२,५०,६४१/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५१ (दक्षिण) अंतर्गत गल्ली नं.२२, २३ व २४ इंदिरानगर येथे १००, १५० मी.मी. व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,५०,६४१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१ :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रा तर्फे खालील दोन ग्रंथ (प्रत्येकी एक हजार प्रती) छपाई करण्यात आल्या आहेत.

१) धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन - डॉ.प्रदिप आगलावे

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुल्यात्मक राजकारण- डॉ.आर.के.क्षीरसागर

सदर ग्रंथाच्या छपाईवर रू.६,५८,१८८/- खर्च झाला आहे. ग्रंथ छपाईचा उद्देश नफा कमविणे नसून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे हा आहे. त्यामुळे सामान्य वाचकास परवडतील असे दर प्रती ग्रंथ रू.१५०/- असावा. तसेच ग्रंथ प्रकाशनाच्या वेळी लेखकांना प्रत्येकी एक व व्यासपिठावरील मान्यवरांना व वृत्तपत्रांना विनाशुल्क सुमारे १०० प्रती आदरपूर्वक देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच वेळोवेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मा.मंत्री, देश, विदेशातील प्रख्यात साहित्यीक भेट देतात त्यांना सन्मानपुर्वक ग्रंथ सप्रेम भेट (विनामुल्य) देण्यात यावेत.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रा तर्फे छपाई करण्यात आलेल्या धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुल्यात्मक राजकारण या ग्रंथांसाठी दर प्रती ग्रंथ रू.१५०/- तसेच ग्रंथ प्रकाशनाच्या वेळी लेखकांना प्रत्येकी एक व व्यासपिठावरील मान्यवरांना व वृत्तपत्रांना विनाशुल्क सुमारे १०० प्रती आदरपूर्वक देण्यास आणि वेळोवेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मा.मंत्री, देश विदेशातील प्रख्यात साहित्यीक भेट देतात त्यांना सन्मानपुर्वक ग्रंथ सप्रेम भेट म्हणून विनामुल्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९२ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, महानगरपालिकेच्या मालकीचे विविध विभागातील भंगार साहित्य, जुने निरुपयोगी टायर्स, जुने फर्निचर, जुने निरुपयोगी विद्युत साहित्य व यंत्रसामुग्री इत्यादीचा आहे त्या स्थीतीत कार्यालयीन जाहिर निविदा सुचना जाक्र/मनपा/शअ/२००९/१०६५ दिनांक २३.११.२००९ प्रमाणे करण्यात आला आहे. जाहिर निविदा नोटीस दैनिक सकाळ, पुण्यनगरी, सामना ईत्यादी वर्तमान पत्रात देण्यात आली. व लिलावा संबंधी निर्णय घेण्यासाठी खालील अधिका-यांची समिती गठीत करण्यात आली.

१. उपआयुक्त (महसुल)

२. शहर अभियंता

३. मुख्यलेखाधिकारी

४. मुख्यलेखापरिक्षक

५. अतिरिक्त शहर अभियंता

६. उपअभियंता (तांत्रिक)

दिनांक ३१.१२.२००९ रोजी मुख्यलेखापरिक्षक यांच्या दालनात उपरोक्त समितीच्या सदस्यांसमोर व निविदा धारकां समोर प्राप्त निविदा उघडण्यात आल्या. एकुण ५ निविदा प्राप्त झाल्या. खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले आहेत.

१. साहित्य स्थळ : <u>प्रकल्प संचालक सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना</u>.

| अ.क्र | साहीत्याचे नाव | मुल्यांकन किंमत | मे शेख जहिर शे गणी | मे मिर्झा स्टील | मे सिराज सिध्दीकी | मे वेलकम स्क्रप | मे राजदिप सु.बे.से.संस्था |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोठे कपाट - ०६ नग<br>टेबल - - २४<br>खुर्ची - - ०२<br>कॉम्प्युटर - - ०१ | २०,४००/- | ५,९००/- | <u>११,०००/-</u> | ८,८००/- | ८,०००/- | १०,०००/- |

२. <u>व्यवथापक सिध्दार्थ जल तलाव</u>

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्लॅस्टीक खुर्ची<br>झारी<br>फिनेल ड्रम लोखंडी<br>लोखंडी कपाट मोठे<br>वॉटर कुलर<br>लोखंडी बकेट | २०<br>१३<br>१०<br>०१<br>१<br>४ | ११,५६०/- | ४,४७५/- | <u>१३,०००/-</u> | १२,५००/- | ११,०००/- | १२,१००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद लॉकर्स ४<br>कार्यालयीन टेबल १ | | | | | | |

## ३ नगरसचिव विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | एंकर कुलर - ०२<br>फिटींग पाईप(लाईट)- --<br>छोटे कपाट - ०२<br>परपारेटर मशीन- ०१<br>लाकडी खुर्ची- ०१<br>टैबल- ०१<br>नळ फिटींग पाईप (किरकोळ)-<br>किरकोळ विद्युत सामान-<br>संगणक कि बोर्ड- ०३<br>संगणक माऊस- ०५<br>लाईन कनेक्टर - ०२ | २२,८००/- | २,३७५/- | ५,०००/- | ३,८००/- | ४,०००/- | ३,५००/- |

४. मुख्य पशुसंवर्धन विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | Sinclaire video projector system<br>५ NV ४००<br>Sr no ९५०८-०९५ | २४९०००/- | ४०००/- | ६००/- | १००/- | ३५०/- | ३००/- |

५ विधी सल्लागार विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | खुर्च्या - ०४<br>लाकडी खोके- ०२<br>प्लॅस्टीक पाईप- ०१<br>किरकोळ लाकडी साहित्य-००<br>प्लॅस्टीक बादली- ०१ | १,६५०/- | १६५/- | २,०००/- | १,५००/- | १,०००/- | ६००/- |

६ अतिरिक्त शहर अभियंता

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | लिलाव कार्यवाही पुर्ण | | | | | | |

### ७ उपअभियंता विद्युत विभाग.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | PVC Arm/urarm cable and wire (Aluminium) -1000kg.<br>HG/MS/GI metallic materials/ Panel board - 125kg.<br>PVC materials etc. - 300kg.<br>IC switches/MC switches/DP/DB/TP/ feeder piller etc. -47kg.<br>All types of fluo tube fitting - 850<br>All type of accessories such as tube starter / Holder / MCB -60kg<br>All type of chokes- 810kg<br>All type of AC unit (window) -02<br>Air cooler of any size (with fan) - 07 | १,१३,७३० | २,९७,४८८ | १,११,००० | ७३,५५५ | १,३०,४७६ | ८२,७७४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Inverter/UPS-1KVA<br>40 watt tube rod(Lamp)- 5000<br>125 Watt HP MV lamp 337<br>250 Watt HP MV Lamp 193<br>70 Watt HPSV Lamp 928<br>150 Watt HPSV lamp 2667<br>250 Watt HPSV lamp 446<br>All types of Ignitors 2511<br>70 watt Metal Hallide Lamp16<br>All types of contactors 36 kg<br>150 Watt Metal Hallide Lamp 07<br>250 Watt Metal Hallide Lamp 26<br>400 Watt Metal Hallide Lmap 32<br>All types of Batteries 1875 kg<br>All types of Timers 2 kg | | | | | | |

८ उपअभियंता यांत्रिकी विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | विविध साईजचे जुने - ३४४<br>निरोपयोगी टायर्स (एक लॉट)<br>रिकामे ऑईल बॅरेल<br>(लोखंडी २१० लिटर) - ७१<br>प्लास्टीक कॅन विविध साईज<br>१५/२०/२५/५० लिटर क्षमता - ४६<br>जुने भंगार साहित्य - ११.५ टन<br>फायर इंजिन डिवाटीरंग सेट - ०२ | ३,५३,९०० | १,९६,१६० | २,२८,९७३ | १,१५,००० | १,६५,००० | १,४५,००० |

९. शिक्षणाधिकारी विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १.प्रा.शा.हर्सुल गाव<br>नादुरुस्त डयुल डेक्स,-<br>खुर्ची,-<br>बेंच -<br>बालवाडीसाठी देण्यात आलेली<br>नादुरुस्त खेळणी -<br>टाकी व इतर साहित्य-<br>२. के.प्रा.शा.प्रियदर्शनी इंदिरानगर<br>विद्यार्थी बेंच - १०<br>पाण्याचे टाकी- ०२<br>फळा- ०१<br>लाकडी टेबल- ०१<br>३.प्रा.शा.जवाहर कॉलनी<br>लाकडी कपाट- ०२<br>लोखंडी कपाट- ०२<br>जुना बेंच- ०१<br>४.प्रा.शा.विष्णूनगर<br>लोखंडी खुर्ची- २<br>बेंच- २<br>घसरगुंडी- १<br>लोखंडी झोका- १ | २११४६०/- | ५१,८९०/- | ४०,०००/- | ३९,९००/- | ३५,०००/- | ७२,५५०/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लोखंडी चक्र- १<br>५.प्रा.शा.इंदिरानगर बायजीपूरा<br>लाकडी खुर्ची- २<br>लाकडी टैबल- २<br>डयुल डेक्स - २५<br>केनिंग खुर्ची.- १<br>६.प्रा.शा.पैठणगेट प्रा.शा.<br>लोखंडी कपाट- २<br>लोखंडी खुर्ची- २<br>लाकडी टेलब- १<br>बेंच - ५<br>घोडा लाकडी - २<br>लाकडी फळा- १<br>७.प्रा.शा. रोहिदासपूरा<br>लोखंडी दरवाजा- १<br>रॅक- १<br>टयुबलाईट पटया- ४<br>लोखंडी खुर्ची - १<br>स्टुल - १<br>लाकडी स्टुल- १<br>८. प्रा.शा.जिन्सी<br>Plastic खुर्ची- ८<br>डयुल डेक्स- ४<br>९.ा.शा. नुतन कॉलनी<br>अजबनगर-<br>टेबल- २<br>बेंचेस- २<br>खुर्ची लाकडी- ४<br>१०. प्रा.शा. कैलासनगर<br>डयुल तुटलेले - ३५<br>खुर्ची- १<br>लाकडी खुर्ची- १<br>तुटलेला टेबल- ३<br>खुर्ची फायबर- ९<br>बालवाडी लहान- ५<br>११.ा.शा.एन-७ सिडको<br>डयुल डेक्स - ४०<br>गेट कमान- १<br>बेंच - १६<br>प्लास्टीक खुर्ची- ५<br>लोखंडी खुर्ची- ४<br>लाकडी खुर्ची- ४<br>पत्रापेटी- १<br>EÖðË±ÉMÉ फॅन-४<br>पुस्तक पेपर रद्दी- ५ kg<br>लाकडी कपाट- १<br>१२. प्रा.शा.अशोकनगर<br>लोखंडी खुर्ची- ४<br>टैबल- ३<br>बेंच- ५ | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | डयुल डेक्स- ७ | | | | | | |
| | मेनगेट- १ | | | | | | |
| | खिडक्या- २ | | | | | | |
| | लाकडी टेबल- ५ | | | | | | |
| | <u>१३. प्रा.शा.ब्रिजवाडी</u> | | | | | | |
| | लोखंडी खुर्ची- ७ | | | | | | |
| | लाकडी खुर्ची- २ | | | | | | |
| | पुस्तके- ३ kg | | | | | | |
| | <u>१४.प्रा.शा.नारेगाव</u> | | | | | | |
| | बाक- १२ | | | | | | |
| | तुटलेले टेबल- २ | | | | | | |
| | खुर्ची- २ | | | | | | |
| | फायबर खुर्ची - ५ | | | | | | |
| | बेचेंस - १ | | | | | | |
| | लोखंडी गेट- १ | | | | | | |
| | लोखंडी रॅक- १ | | | | | | |
| | <u>१५.प्रा.शा. गारखेडा</u> | | | | | | |
| | गेट- १ | | | | | | |
| | खुर्ची- १ | | | | | | |
| | खराब स्टील टाकी- १ | | | | | | |
| | टेबल- १ | | | | | | |
| | <u>१६.प्रा.शा.पडेगाव कॉलनी</u> | | | | | | |
| | लोखंडी लहान कपाट- १ | | | | | | |
| | लोखंडी बादली- १ | | | | | | |
| | लोखंडी टोपले- १ | | | | | | |
| | लोखेकडी शोकेस- १ | | | | | | |
| | लोखंडी - १ | | | | | | |
| | लोकडी बॅच- १ | | | | | | |
| | लाकडी टेबल २ | | | | | | |
| | प्लॅस्टीक खुर्ची- २ | | | | | | |
| | लाकडी खुर्ची- २ | | | | | | |
| | <u>१७.प्रा.शा.एन-९ सिडको</u> | | | | | | |
| | लाकडी बेंच- १० | | | | | | |
| | डयुल डेक्स - ४० | | | | | | |
| | केन खुर्ची - ५ | | | | | | |
| | लाकडी खुर्ची- ५ | | | | | | |
| | टेबल - ५ | | | | | | |
| | लोखंडी टाकी- ५ | | | | | | |
| | <u>१८.प्रा.शा.एन- ७ सिडको</u> | | | | | | |
| | डयुल डेक्स - ६० | | | | | | |
| | बेंच - १० | | | | | | |
| | लाकडी खुर्ची - ०५ | | | | | | |
| | टेबल - ०५ | | | | | | |
| | लोखंडी टाकी- ०५ | | | | | | |
| | <u>१९.प्रा.शा.एन-११ हडको</u> | | | | | | |
| | लोखंडी खुर्ची - ८ | | | | | | |
| | फुटके टोपले - २ | | | | | | |
| | लोखंडी फुटकी बकेट- १ | | | | | | |
| | तूटलेला टेबल - १ | | | | | | |
| | बेंचे फ्रेम- १ | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाकडी तुटका बेंच- ५<br>डयुल डेक्स - ४<br>जुनी पुस्तके - ३<br>२०.प्रा.शा.एन-१२ हडको<br>डयुल डेक्स - १०<br>जाळी खुर्ची - ०३<br>बेंच- ०७<br>लाकडी टेबल- ०२<br>लोखंडी टेबल- ०१<br>२१.प्रा.शा.मुकुंदवाडी<br>डयुल डेक्स - १०<br>फायबर खुर्ची - ११<br>लोखंडी खुर्ची - ४<br>पत्रा खुर्ची - ४<br>लाकडी खुर्ची- ६<br>टाकडी टेबल - ४<br>लोखंडी टेबल- ६<br>लोखंडी बेंच- २<br>लाकडी बेच १<br>रद्दी - ७ kg<br>फॅन- ०३<br>२२.प्रा.शा.न्यु हनुमाननगर<br>खुर्ची- १<br>बालवर्गाच्या मोडक्या<br>सायकली- १५<br>२३.प्रा.शा.संजयनगर<br>प्लायऊड बेंच- १८<br>गेट जाळी- १<br>लोखंडी खुर्ची- १<br>रद्दी ७<br>प्लास्टीक टाकी- १<br>लोखंडी प्रवेशद्वार- ११<br>२४.प्रा.शा.जयभवानीनगर<br>लाकडी टेबल- १<br>फायबर खुर्ची- १<br>२५.प्रा.शा.पदमपूरा<br>लाकडी भंगार - ५०<br>लोखंडी भंगार - १०० kg<br>रद्दी वहया/पुस्तके- २०० kg<br>२६.प्रा.शा.कांचनवाडी<br>बेच - १५<br>टेबल- २<br>खुर्ची- २<br>कपाट- ४<br>लहान सायकल- ४<br>रद्दी- ४<br>२६.प्रा.शा.घाटी बेगमपूरा<br>डयुल डेक्स- १२<br>सिसॉ- ४<br>लोखंडी कमान- १ | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | घसरगुंडी- १<br>लोखंडी खुर्ची- १<br>लोखंडी कपाट- १<br>बेंच-५<br>लोखंडी टेबल- ३<br>लोखंडी गोल- १<br>ग्रिल- १<br>पत्र्याचे ठोल- २<br>तबला- ५<br>टयुबलाईट पटया- १<br>लोखंडी खु्र्ची- २<br><u>२७.प्रा.शा.नागेश्वरवाडी</u><br>प्लास्टीक खुर्ची- ६<br>लाकडी खुर्ची - ४<br>जाळीच्या खुर्च्या - २<br>लाकडी स्टुल १<br>लोखंडी घमेले- १<br><u>२८.प्रा.शा. किराडपूरा १</u><br>लाकडी खुर्ची- २<br>लोखंडी खुर्ची- २<br>डयुल डेक्स - १५०<br>लाकडी घोडे - २<br>सायकल- ४<br><u>२८.प्रा.शा. किराडपूरा २</u><br>टेबल - ३<br>बेंच- ३<br>खुर्ची- १<br>सोकेस- १<br>प्लास्टीक खुर्ची- १<br>लाकडी घोडा- १<br>फळा- १<br>स्टो- १<br><u>२९.प्रा.शा. शहाबाजार</u><br>सायकलचे तुकडे<br>घोडयाचे तुकडे- ८<br>डयुल डेक्स - २<br>बेच- ४<br>खुर्ची<br><u>३०.प्रा.शा. यशोधरा कॉलनी</u><br>खुर्ची- ४<br>घोडे - ५<br>लोखंडी कपाट- १<br>लोखंडी सायकलचे भाग -३<br>लोखंडी खुर्ची - ४<br>लोखंडी टोपले- १<br>बेचचे लोंखडी रॉड<br>वातीचा स्टो - १<br>प्लास्टीक बकेट- २<br>लाकडी फळा - १<br>लोखंडी पाटया- ३ | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३१.प्रा.शा. कैसर कॉलनी<br>खुर्ची - २<br>स्पीकर - २<br>बालवाडी सायकल- ३<br>लाऊड स्पिकर- १ | | | | | | |

## ९ प्रभाग अधिकारी ई विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | टेबल- ०३<br>प्लॅस्टीक खुर्च्या- ३<br>लोखंडी खुर्च्या- ०५<br>लाकडी खुर्च्या- ०२ | ३,०००/- | २४०/- | ७०/- | -- | -- | १२०/- |

## १० निवडणूक अधिकारी विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **११** | खिडकीची काच- ०१<br>लोखंडी जाळी- ०१ | ४२०/- | १०/- | ५०/- | -- | -- | ८०/- |

## ११ जकात अधिक्षक विभाग.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१२** | ऑफिस टेबल<br>(तुटलेले)- ०२<br>कुलर (खराब)- ०२<br>ऑफिस टेबल लाकडी-०२<br>तुटलेल्या खूर्च्या- १५<br>तुटलेला पंखा- ०१<br>तुटलेलस बेंच- ०१ | १,१००/- | १,००५/- | ७००/- | -- | -- | १,०००/- |

**१२. जकात अधिक्षक विभाग**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | लाकडी खुर्ची- ०५<br>रिव्हॉल्वींग चेअर- ०२<br>कुलर (खराब)- ०२<br>केन चेअर- ०१<br>ऑफिस टिपॉय लाकडी-०१<br>पत्र्याचा बोर्ड (३ बाय ५)-०३<br>लोखंडी बेंच (२ बाय ४)-०१<br>लाकडी बेंच (१ बाय ६)-०१<br>व्यॅक्युम क्लिनर- ०१<br>गॅस शेगडी- ०३<br>मिक्स घरगुती भांडे- ०१<br>सोलर फ्रेम लोखंडी- ०१<br>(३ बाय ३) -०१<br>कांरजे लोखंडी शॉवर (गोल)-०१<br>कुलरचे ट्रे पत्र्याचे- ०२<br>लोखंडी पाईप (१५ फुट) -०३<br>लोखंडी घडवंची - ०१<br>स्पिच बोर्ड व स्टँड- ०१<br>लोखंडी स्टँड (५ बाय ५)-०१<br>कुलरचे ट्रे पत्र्याचे- ०२<br>लोखंडी पाईप (१५ फुट)-०३<br>लोखंडी घडवंची- ०१<br>स्पिच बोर्ड व स्टँड- ०१<br>स्पिच बोर्ड व स्टँड- ०१<br>लोखंडी स्टँड (५ बाय ५)-०१ | ३,५००/- | २,२१६/- | २,७००/- | -- | -- | ३,५००/- |

उपरोक्त तुलनात्मक दष्टया ज्या निविदा धारकाचे दर सर्वात जास्त आहेत. त्यांच्याशी दिनांक ३०.१.२०१० रोजी मुख्यलेखाधिकारी यांनी निविदा धारकाशी वाटाघाटी करुन चर्चेअंती खालील प्रमाणे लॉट प्रमाणे निविदा धारकाचे दर निश्चित केले.

**गोषवारा**

| अक | साहित्य स्थळ | मुल्यांकन किंमत | निश्चित केलेली किंमत | व्हॅट टॅक्स ४ टक्के | एकुण किंमत | निविदा धारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प संचालक सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना. | २०,४००/- | १३,०००/- | ५२०/- | १३,५२०/- | मे. मिर्झा स्टील औबाद | |
| २ | व्यवस्थापक सिध्दार्थ जल तलाव | ११,५६०/- | १३,०००/- | ५२०/- | १३,५२०/- | मे. मिर्झा स्टील औबाद | |
| ३ | नगरसचिव विभाग | २२,८००/- | ८,०००/- | ३२०/- | ८,३२०/- | मे. मिर्झा स्टील औबाद | |
| ४ | मुख्य पशुसंवर्धन विभाग | -- | -- | -- | -- | -- | सद्य स्थगीत |
| ५ | विधी सल्लागार विभाग | १,६५०/- | २,०००/- | ८०/- | २,०८०/- | मे. मिर्झा स्टील औबाद | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | अतिरिक्त शहर अभियंता (प्राणि संग्रहालय) | -- | -- | -- | -- | -- | लिलाव कार्यवाही पूर्ण |
| ७ | उपअभियंता विद्युत | १,१३,७३०/- | २,९७,४८८/- | ११९००/- | ३,०९,३८८ /- | मे शेख जहीर, शे गणी औबाद | |
| ८ | उपअभियंता यांत्रिकी | ३,५३,९००/- | २,५३,३८०/- | १०१३५/- | २,६३,५१५/- | मे. मिर्झा स्टील औबाद | |
| ९ | शिक्षणाधिकारी विभाग | २,११,४६०/- | ८५,०००/- | ३४००/- | ८८,४००/- | मे राजदिप सु.बे. सह संस्था औबाद | |
| १० | प्रभाग अधिकारी ई | ३,०००/- | १,०००/- | ४०/- | १,०४०/- | मे शेख जहिर शे गणी औबाद | |
| ११ | निवडणुक अधिकारी | ४२०/- | २००/- | ८/- | २०८/- | मे राजदिप सु.बे. सह संस्था औबाद | |
| १२ | जकात अधिक्षक | १,१००/- | १,००५/- | ४०/- | १,०४५/- | मे शेख जहिर शे गणी औबाद | |
| १३ | भांडार विभाग | ३,५००/- | ३,५००/- | १४०/- | ३,६४०/- | मे राजदिप सु.बे. सह संस्था औबाद | |
| | एकुण | ७,४३,५२०/- | ६,७७,५७३/- | २७,१०३/- | ७,०४,६७६/- | | |

उपरोक्त १३ ॲटमपैकी ॲटम क्र ४चे मुल्यांकन किंमत रुपये २,४९,०००/- किंमती ऐवजी मे. शे. जहिर शे. गणी यांची निविदा सर्वात जास्त निविदा किंमत रुपये ४०००/- आहे. त्यामुळे या ॲटमची लिलाव प्रक्रिया स्थगीत ठेवण्यात आली आहे. तसेच ॲटम क्र ६ प्राणिसंग्रहालय येथील भंगार साहित्याचा लिलाव प्रक्रिया प्राणिसंग्रहालय विभागाने पूर्ण केली आहे.

उर्वरीत ११ ॲटमसाठी खालील प्रमाणे किंमत येत आहे.

| अ.क्र | विवरण | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मनपाने निश्चित केलेली एकुण मुल्यांकन किंमत | ७,४३,५२०/- |
| २ | वाटाघाटीअंती निश्चित केलेली एकुण किंमत | ६,७७,५७३/- |
| ३ | त्यावर वसुल करावयाचा व्हॅट टॅक्स | २७,१०३/- |
| ४ | व्हॅट टॅक्स भरुन घ्यावयाची एकुण रक्कम | ७,०४,६७६/- |

महानगरपालिकेने निश्चित केलेल्या केलेल्या रुपये ७४३५२०/- किंमत ऐवजी रुपये ७०४४७६/- इतकी किंमत आली आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. ज्या निविदा धारकाच्या नांवावर भंगार साहित्याचा लॉट मंजुर झाला त्याच्या कडुन व्हॅट टॅक्ससह एकुण रक्कम मनपा फंडात भरणा करण्यात येईल. वरील प्रमाणे निविदा धारकांचे लॉट प्रमाणे दर मंजुर करणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री. प्रशांत देसरडा : नवीन पदाधिकारी,अधिकारी येतात त्यांचे दालनाचे नवीन काम रंगरंगोटी होते जुने साहित्य काढून नवीन दिले जाते याचा लेखाजोखा कुठे असतो माहित नाही.प्लॅस्टीक खुर्च्या टुलडेक्स,आसनपटटी,पंखे,टयुबलाईट व इतर साहित्य किती खरेदी केले माहिती घेतली असता २५ टक्के खरेदी नवीन खरेदी केलेले व जुने साहित्य आढळून येत नाही.खडकेश्वर वाचनालयात जुन्या इमारतीत अनेक टेंबल खुर्च्या व इतर साहित्य धुळखात पडून आहे याकडे कुणाचे लक्ष नाही शाळेच्या हॉलमध्ये उघडयावर आसनपटटया असतात हॉलला कुलूप नसते.किती साहित्य खरेदी केले व जुने विकले या बाबत स्टॉक रजिस्टर आवश्यक आहे. २-३ वर्षात भांडार विभागाकडून किती साहित्य खरेदी केले माहिती विचारली असता १ महिण्यात उत्तर दिले जाईल असे म्हटले होते अदयाप दिले नाही. लेखाजोखा ठेवण्याची पध्दत कशी आहे माहिती दयावी.

श्री.रविकांत गवळी :वर्ग -४ चे प्रकाश गडवे हे कारगीर भवन ,एन-९ कम्युनिटी सेन्टर येथे श्री.अरून बनकर,एन-५ गुलमोहन कॉलनी नाटयगृह येथे श्री. अंभोरे ,सादीया टॉकीज मार्केट येथे श्री. सय्यद शहा हे कर्मचारी सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात हे सर्व कर्मचारी मालमत्ता विभागात अरेरावीची भाषा करीत होते. सदर कर्मचारी २४ तास सेवा करतात पर्यायी कर्मचारी तेथे दिले जात नाही अशा वेळी त्यांनी त्यांचे दैनदिंन कौटुंबीक गरजा केंव्हा पूर्ण करायचा असा प्रश्न येतो.अधिका-यांची व्हिजीट झाल्यास गैरहजेरी टाकली जाते. अशा वेळी त्या कर्मचा-यांनी काय करायला पाहिजे. किती वास्तु व त्यावर किंती कर्मचारी सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहे.

मालमत्ता अधि. :कारगील भवन,एन-९ व एन-२ येथील कम्यूनिटी सेंन्टर व इतर वास्तुच्या ठिक्राणी सुरक्षा रक्षक तैनात केलेले आहे.स.९ ते दु. ५ पर्यत त्यांची सेवा असते

एक दुस-या ठिकाणी सेवा बदलली जाते. एकमेकाना सहकार्य करणेबाबत त्यांना सुचना दिलेल्या आहे.श्री.प्रकाश गडवे यांनी कारगील भवन येथे कुटूंबासह राहून २४ तास देखभाल करावी या दृष्टीने एक निवासी खोली विनामूल्य त्यांना दिलेली आहे.ते कुटूंबासह तेथे राहत नाही हा दोष त्यांचा आहे.

श्री.रविकांत गवळी :निवासी वापरासाठी खोली दिली २४ तास राहतात तरी गैरहजेरी टाकली जाते एक कर्मचा-याचा हा प्रश्न नाही इतरांचीही हिच बोंब आहे.२४ तास सेवा घेणे नियमाने योग्य आहे का ? तेथे पर्यायी कर्मचारी नको का ?

मालमत्ता अधिकारी :लोकल सेल्फ गव्हरमेंन्टचे अधिकारी कारगील येथे येणार होते श्री.प्रकाश गडवे यांना तेथे हजर राहण्याचे सुचना दिल्या होत्या ते हजर नव्हते..

श्री.रविकांत गवळी :निवासाची व्यवस्था केली म्हणजे २४ तास सेवा करायची का ? हे योग्य वाटत नाही.

मालमत्ता अधिकारी : २४ तास सेवा करण्याची गरज नाही.कुटूंबासह तेथे राहिल्यास देखभाल करणे त्यांचे काम आहे.

श्री.भगवान घडमोडे :सदर कर्मचा-यांना न्याय मिळावा परंतु कार्यालयात येवून आरेरावीची भाष किंवा शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा निर्माण करीत असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.रविकांत गवळी :प्रशासनाचे पत्रानुसार सदर कर्मचारी यांनी ४ वेळेस खुलासा केला त्यांना न्याय मिळाला नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :निवासाची व्यवस्था केल्यानंतर २४ तास सेवा करणे हरकत नाही.एन-६ भागात एक वॉचमन २४ तास सेवा करतात.

श्री.रविकांत गवळी :२४ तास सेवा घेणार असेल तर त्यांना जास्तीच्या कामाचा मोबदला देण्यात यावा किती इमारती आहे तेथे २४ तास सेवा करणारे किती कर्मचारी आहे त्यांना सर्व सेवा-सुविधा दिलेल्या आहेत का ?

मालमत्ता अधिकारी :एकूण १८ कर्मचारी असून स्मशानभुमीसाठी ३० स्मशानजोगी हे पुर्ण निवासी आहेत.२४ तास सेवा करतात.श्री.प्रकाश गडवे यांनी निवासाची मागणी केली होती.त्यामूळे राहण्यासाठी खोली दिली.२४ तास सेवा करणे व निवासी असणे दोन्ही बाबी वेगवेगळया आहेत.

श्री.रविकांत गवळी :२४ तास सेवा करून संतुलन बिघडू शकते. वाजवीपेक्षा जास्त सेवा घेवू नये आवश्यक पडल्यास खाजगी सुरक्षा रक्षक नियुक्त करून मालमत्ताची देखभाल करावी.

मा.सभापती मालमत्ताची देखभाल करण्यासाठी आवश्यकतेनूसार खाजगी सुरक्षारक्षक नेमून कार्यवाही करावी.

उपआयुक्त (सिडको) :श्री.प्रकाश गडवे यांना तेथे निवासी खोली दिली त्यांनी स्वत:चे घर समजून त्या वास्तूची देखभाल करणे अपेक्षीत आहे.किती मालमत्ता आहे व कर्मचारी किती याचा व खर्चाचा आढावा घेवून आवश्यक ठिकाणी खाजगी यंत्रणा लावून कार्यवाही करता येईल.

श्री.भगवान घडमोडे :करोडोच्या मालमत्ता आहे सुरक्षेचा खर्चाचा विचार केला तर या मालमत्ता हातून जातील महापालिकेने नुकसान होईल त्यासाठी आवश्यक पडल्यास खाजगी एजन्सी नेमून तेथे सुरक्षा दयावी.

श्री.रविकांत गवळी :भंगार साहित्य देण्याचा प्रस्ताव आला शाळेचे अनेक साहित्य त्यात टेंबल खुच्या दरवाजे व इतर वस्तु आहे सुरक्षा नसल्यामूळे लोक तोडफोड करतात हर्षनगर शाळेच्या वरच्या भागात लोक जुगार खेळतात.शिक्षकाचे ते ऐकत नाही.सुरक्षा रक्षक असल्यास असे साहित्य भंगार मध्ये वारवांर देण्याची वेळ येणार नाही.व अवैध धंदे बंद होतील.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सर्वच ठिकाणी वॉचमन दयायचे झाल्यास हा धोरणात्मक निर्णय आहे. एकाचा विचार न करता सर्व कर्मचा-याच्या दृष्टीने विचार करावा.

श्री.प्रशांत देसरडा :मी प्रश्न दिला होता शहरात ७ हजार मालमत्ता आहे ७०० ची यादी मला दिली.सर्व ठिकाणी वॉचमन दयायचे असेल तर सर्वसाधारण सभेत निर्णय घ्यावा लागेल.

श्रीमती मोमीन सोफिया :औरंगाबाद टाईम्स कॉलनीतील पुलाचे कामाची वर्क ऑर्डर होवून ३ वर्ष झाले अदयाप काम सुरू केले नाही.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी माहिती दयावी.

कार्य.अभियंता-ब व क :या कामाचे मुळ अं.प.रू.१९,९०,७७० चे होते वर्क ऑर्डर दिली होती. परंतु आता तेथील भौगोलिक परीस्थिती वेगळी असून नाल्यावरील पुलाची उंची वाढत असल्याने वाढीव रू.९.२३ लक्षचे अंदाजपत्रकास मान्यता घेणेसाठी कार्यवाही पूर्ण झाली परंतु आता त्यासाठी बजेट नाही परंतु येणा-या रिवाईज बजेटमध्ये तरतूद करण्या बाबत सादर केले आणि रेग्युलर काम सुरू करावे यास मंजुरी मिळेल असे अपेक्षीत आहे.

मा.सभापती पुलाची उंची वाढत असल्याने ९.२३ लक्ष वाढीव खर्च लागणार तेवढा निधी उपलब्ध आहे का ?

मुख्यलेखाधिकारी :सुधारीत बजेट मध्ये तरतूद करावी लागेल.दोन दिवसात कार्यवाही होईल.

मा.सभापती :औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील पुलाचे कामाचे ३ टक्के कमी दराने म्हणजे एकूण खर्च १९,९०,७७० इतक्या खर्चाची वर्क ऑर्डर झाली होती आता जागेवरील भौगोलिक परीस्थितीनुसार पुलाची उंची वाढते त्यामूळे वाढीव रू.९.२३ लक्ष खर्च लागणार असून सुधारीत बजेटनुसार दोन दिवसात मुख्यलेखाधिकारी यांनी या रक्कमेची तरतूद करून लगेच या पुलाचे काम सुरू करण्यास मंजूरी देत आहे.

श्री.रविकांत गवळी :महापालिकेच्या एकूण मालमत्ता किती,हर्षनगर,हर्सुल शाळेची परीस्थिती भयानक असून टेंबल, ,खुर्च्या,ब्लॅकबोर्ड,कम्युनिटी सेन्टरचे दरवाजे, खिडक्या अज्ञात व्यक्ती घेवून जातात.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

शिक्षणाधिकारी :शाळेत सुरक्षा रक्षक नसल्यामूळे अनेक साहित्य अज्ञात लोक घेवून जातात मोठे नुकसान होते.

श्री.प्रशांत देसरडा :शाळेसाठी असलेले वीज,नळ कनेक्शनमधून बाजूच्या लोकांना कनेक्शन दिले जाते त्याचा बोजा महापालिकेवर येतो याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.रविकांत गवळी :एप्रिल २००६ पासून सिडकोचे हस्तांतरण झाले कम्युनिटी सेंन्टरची व इतर सिडको हडकोतील वास्तु सुरक्षीत राहण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमावे.

उपआयुक्त(सिडको) :प्रत्येक मालमत्तासाठी सुरक्षा रक्षक देणे यात खर्च वाढेल त्यांचा परीणाम विकास कामावर होईल.

मुख्यलेखाधिकारी :सुरक्षा रक्षक नेमण्या बाबत अनेक विभागाकडून मागणी झाली परंतु अस्थापनावरील खर्च पाहता भविष्यात कमी होणे आवश्यक आहे.सदर संचिकेवर तसे अभिप्राय दिले. ६ व्या वेतन आयोगामूळे या खर्चात मोठी वाढ झाली याचा विचार करता नव्याने असा खर्च अस्थापनावर लादणे योग्य नाही. त्याच कर्मचाऱ्याकडून एक दुसऱ्याच्या जागेवर त्या-त्या विभागाने नियोजन करून खर्चाची काटकसर कशी होईल त्या पध्दतीने काम करून घ्यावे.

मा.सभापती :अस्थापनेवरील खर्च जास्त आहे. त्यामूळे नव्याने सुरक्षा रक्षक देणे शक्य होत नाही विभाग प्रमुख यांचे आखत्यारीत ज्या मालमत्ता आहेत त्यांनी त्या सुरक्षीत राहण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.सर्वच ठिकाणी सुरक्षा देणे बाबत नंतर विचार केला जाईल.

श्री.प्रशांत देसरडा :अधिकारी, पदाधिकारी यांचेकडील जास्तीचे कर्मचारी आहे ते देण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी :महापालिकेच्या शाळा, कम्युनिटी सेंन्टरवर वॉचमन देण्याचा विचार करावा.इमारतीमधील साहित्याची मोडतोड होणार नाही याची दखल घ्यावी.

श्रीमती मोमीन सोफिया :कब्रस्तान मध्ये ही वॉचमन दयावे.महापालिकेच्या मालमत्ताचे संरक्षण करावे

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :इतर विभागाचे भंगार साहित्य असेल ते देण्याचे आदेश करावे.

मा.सभापती :विषय क्र.३९२ मंजूर करण्यात येते. इतर कोणत्याही विभागा असे भंगार साहित्य असेल ते संबधीत विभाग प्रमुख यांनी नियमानुसार या पध्दतीने कार्यवाही करावी. जी कमेटी सध्या आहे त्या कमेटीला स्थायी समिती पुढे मुदतवाढ देत आहे.ऐनवेळचे प्रशासनाचे व सदस्यांचे आलेले सर्व प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे विविध विभागातील भंगार साहित्य, जुने निरुपयोगी टायर्स, जुने फर्निचर, जुने निरुपयोगी विद्युत साहित्य व यंत्रसामुग्री इत्यादीचा आहे त्या स्थीतीत जाहीर लिलाव केल्यानुसार उपरोक्त १३ अॅटमपैकी उर्वरीत ११ अॅटमसाठी जाहिर लिलावात प्राप्त किंमतीनुसार ज्या निविदा धारकाच्या नांवावर भंगार साहित्याचा लॉट प्रमाणे दरास मंजुरी देण्यात येते. त्यांच्या कडुन व्हॅट टॅक्ससह खालील प्रमाणे रक्कम मनपा फंडात जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | विवरण | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मनपाने निश्चित केलेली एकुण मुल्यांकन किंमत | ७,४३,५२०/- |
| २ | वाटाघाटीअंती निश्चित केलेली एकुण किंमत | ६,७७,५७३/- |
| ३ | त्यावर वसुल करावयाचा व्हॅट टॅक्स | २७,१०३/- |
| ४ | व्हॅट टॅक्स भरुन घ्यावयाची एकुण रक्कम | ७,०४,६७६/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. ३९३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.के.एन.काटकर, शाखा अभियंता यांचे पत्नीच्या रक्ताचा कर्करोग (Acute Myeliod Lueckemia) या आजारपणावर उपचाराकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था/२००९/११६४ दि.७/७/२००९ अन्वये अग्रीम रक्कम रू.१,५०,०००/- एवढी अदा करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांनी पत्नीच्या आजारपणावर खर्च केलेल्या देयकापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.५,६४,३४७/- एवढी आहे.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.एमएजी-२००८/प्र.क्र.३०६/आरोग्य-५, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१८/२/२००९ अन्वये शासनमान्य रूग्णालयातील वैद्यकीय खर्चाची संपूर्ण परिपूर्ती विहित नियमानुसार अनुज्ञेय राहील. तसेच महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सेवेपोटी होणाऱ्या खर्चाच्या भरपाई संबंधात विनियमामध्ये पान क्र.८ मध्ये १३(अ) वर कर्करोगावर टाटा हॉस्पीटल, मुंबई येथे झालेला खर्च १००% कर्मचाऱ्यास परत मिळेल, असे नमूद केले आहे.

त्यानुषंगाने संबंधीतास अनुज्ञेय रक्कम रू.५,६४,३४७/- च्या ५% रक्कम रू.२८,५१३/- मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.५,३५,८३४/- (अक्षरी रूपये पाच लाख पस्तीस हजार आठशे चौतीस फक्त) एवढी रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करीता रक्कम रू.५,३५,८३४/- मधून संबंधीतास पुर्वी अदा करण्यात आलेली अग्रीम रक्कम रू.१,५०,०००/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.३,८५,८३४/- (अक्षरी रू. तीन लाख पंच्याऐंशी हजार आठशे चौतीस फक्त) च्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.के.एन.काटकर, शाखा अभियंता यांचे पत्नीच्या रक्ताचा कर्करोग (Acute Myeliod Lueckemia) या आजारपणावर उपचाराकरीता अनुज्ञेय रक्कम रू.५,३५,८३४/- मधून संबंधीतास पुर्वी अदा करण्यात आलेली अग्रीम रक्कम रू.१,५०,०००/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.३,८५,८३४/- (अक्षरी रू. तीन लाख पंच्याऐंशी हजार आठशे चौतीस फक्त) च्या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-८, बजरंगचौक ते ओंकार गॅस पर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणे या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाची दरसुची सन २००८-०९ नुसार अंदाजपत्रक रू.१४,८६,५२४/- चे तयार करण्यात आले होते. त्यास मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.२२४ दिनांक ५/१२/२००९ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे.

ई-निविदा विभागतर्फे निविदा कार्यवाही केली असता दर भरलेले तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१. श्री.सुरेश बी. साधवानी - ५% कमी दराने
२. मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स - २.९९% कमी दराने
३. श्री.पी.बी.पाटील इंजिनिअर अँड कॉन्ट्रॅक्टर - २.७१% कमी दराने

उपरोक्त नुसार सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची श्री.सुरेश बी. साधवानी यांची असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे.

करीता श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा ५% कमी दराची निविदा स्विकृती बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-८, बजरंगचौक ते ओंकार गॅस पर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ५% कमी दराची श्री.सुरेश बी. साधवानी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९५ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.९८ अंतर्गत समतानगर ते दंत महाविद्यालयापर्यंत १५० मी.मी. व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी

टाकावयाची आहे. त्यासाठी अंदाजपत्रक म.जी.प्रा.विभा ागाचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१७,९८,६६०/- एवढ्याचे तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समितीची बैठक दि.५.१२.२००९ मधील ठराव क्र.२३० अन्वये मान्यता देण्यात आली. तद्‌नंतर निविदा कार्यवाही करण्यात आली. या कामाचा खर्च भाुडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्ष मधून करण्यात येणार आहे.

सदर कामासाठी ई-निविदेद्वारे बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा विक्री झाली व निविदा स्विकारण्याच्या नियोजित वेळेपर्यंत तीन निविदा प्राप्त झ्राली. ती खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.झोड एस.फारूकी | १६.९९% कमी दर |
| २. | श्री.एस.बी.साधवानी | १६.१६% कमी दर |
| ३. | मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स | १५.१% कमी दर |

वरील प्रमाणे तीन निविदा प्राप्त असून तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.झेड एस फारूकी यांचा असून अं.प.दरापेक्षा १६.९९% कमी असा दर आहे. करीता श्री.झेड एस फारूकी यांची अं.प.दरापेक्षा १६.९९% कमी दराची निविदा मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९८ अंतर्गत समतानगर ते दंत महाविद्यालयापर्यंत १५० मी.मी. व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराची श्री.झेड एस फारूकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३९६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, की, औरंगाबाद मनपाच्या हद्दीमध्ये मौजे पडेगांव येथे महानगरपालिकेकडून रितसर ले-आऊटला मंजुरी घेवून मनपाचे नियमानुसार विकासाचे युवान को-ऑप.हौसिंग सोसायटी, स.नं.६३/पैकी येथे विकासाचे काम सुरू आहे. मुंबई-नाशिक रस्ता हा ६० मीटर रूंदीचा प्रस्तावित असून अंतर्गत ३० मीटर, १५ मीटर व १२ मीटर रूंदीचे प्रस्तावित रस्ते आहेत. मागील २५ वर्षा पासून अद्यापपर्यंत एकाही रस्त्याचे काम मनपाने हाती घेतले नाही.

युवान को-ऑप.हौसिंग सोसायटीतर्फे दि.५/२/२०१० रोजी मा.आयुक्त व मा.सभापती, स्थायी समिती यांचेकडे निवेदनाद्वारे नियोजित रस्त्याचे काम करण्याबाबत विनंती केलेली आहे. करीता रितसर ले-आऊट मंजूर करून काम करीत असलेले मिळकतधारकांना रस्त्याची सुविधा मिळावी म्हणून मौ.पडेगांव येथील गट नं.६३/पैकी पर्यंतचे नियोजित नविन रस्त्याचे काम त्वरीत हाती घ्यावेत. संबंधीत कार्यकारी अभियंता व मुख्य लेखाधिकारी, मनपा औरंगाबाद यांनी रस्त्याची कामे करण्यासाठी सुधारीत अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद ठेवण्याची तसेच सदरचे काम हाती घेण्यास्तव आवश्यक कार्यवाही करावी.

सुचक : प्रशांत देसरडा अनुमोदक : प्रल्हाद निमगांवकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युवान को-ऑप.हौसिंग सोसायटीतर्फे दि.५/२/२०१० रोजी मा.आयुक्त व मा.सभापती, स्थायी समिती यांचेकडे निवेदनाद्वारे नियोजित रस्त्याचे काम करण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार रितसर ले-आऊट मंजूर करून काम करीत असलेले मिळकतधारकांना रस्त्यांची सुविधा मिळावी म्हणून मौ.पडेगांव येथील गट नं.६३/पैकी पर्यंतचे नियोजित नविन रस्त्यांचे व अंतर्गत ३० मीटर, १५ मीटर व १२ मीटर रूंद रस्त्यांचे काम त्वरीत हाती घेण्यासाठी संबंधीत कार्यकारी अभियंता व मुख्य लेखाधिकारी, मनपा औरंगाबाद यांनी सुधारीत अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद ठेवण्यास तसेच सदरचे काम त्वरीत हाती घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.98 कांचनवाडी मधील धिल्लन रेसीडेन्सी येथे जलवाहिनी टाकणे व वॉर्ड क्र.63 कोकणवाडी येथे विविध ठिकाणी बोरींग करणेच्या कामाबाबत प्रभाग समिती-अ चे सभापती श्री.तरविंदरसिंग धिल्लन यांनी मागणी केलेली असून या कामासाठी सर्वसाधारण सभेचे अनुक्रमे ठराव क्र.839 दि.21.12.2009 व ठराव क्र.953 दि.25.1.2010 अन्वये तरतुद वळती करून उपलब्ध करून दिलेली आहे. कांचनवाडी पैठणरोड परिसरात धिल्लन रेसीडेंसी येथे जलवाहिनीची सुविधा देणे व कोकणवाडी येथे विविध ठिकाणी बोरींग करणेची कामे तातडीने करून घेणे आवश्यक असून उपलब्ध तरतुदीस अधीन राहून खालील दर्शविलेली कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

1. वॉर्ड क्र.98 कांचनवाडी धिल्लन रेसीडेन्सी येथे जलवाहिनी टाकणे. -2.00 लक्ष
2. वॉर्ड क्र.63 कोकणवाडी येथे विविध ठिकाणी बोरींग करणे. - 2.00 लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

वॉर्ड क्र. 98 कांचनवाडी मधील धिल्लन रेसीडेन्सी येथे जलवाहिनी टाकणे व वॉर्ड क्र.63 कोकणवाडी येथे विविध ठिकाणी बोरींग करणेच्या कामाबाबत प्रभाग समिती-अ चे सभापती श्री.तरविंदरसिंग धिल्लन यांनी मागणी केल्यानुसार व सर्वसाधारण सभेचे अनुक्रमे ठराव क्र.839 दि.21.12.2009 व ठराव क्र.953 दि.25.1.2010 अन्वये उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीस अधीन राहून कांचनवाडी पैठणरोड परिसरात धिल्लन रेसीडेंसी येथे जलवाहिनीची सुविधा देणे व कोकणवाडी येथे विविध ठिकाणी बोरींग करणेची कामे तातडीने करून घेणे आवश्यक असल्याने खालील दर्शविलेली कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी.

1. वॉर्ड क्र.98 कांचनवाडी धिल्लन रेसीडेन्सी येथे जलवाहिनी टाकणे. -2.00 लक्ष
2. वॉर्ड क्र.63 कोकणवाडी येथे विविध ठिकाणी बोरींग करणे. - 2.00 लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.48 अंतर्गत एन-6 सिडको येथे योगा शेड महानगरपालिकेतर्फे तयार होत आहे. याचे केअर टेकर म्हणून "साई क्रिडा व सांस्कृतिक मंडळ, साईनगर" या स्थानिक संस्थेस बाल योगा, महिला योगा, वृध्द योगा उपक्रम राबविण्यासाठी देण्यात यावे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : दत्ताभाऊ पाथ्रीकर अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.48 अंतर्गत एन-6 सिडको येथे महानगरपालिकेतर्फे तयार होत असलेले योगा शेडचे देखभाल निटपणे व्हावी यासाठी केअर टेकर म्हणून "साई क्रिडा व सांस्कृतिक मंडळ, साईनगर" या स्थानिक संस्थेस बाल योगा, महिला योगा, वृध्द योगा उपक्रम राबविण्यासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका सार्वत्रिक/पोट निवडणुकीच्या कालावधीत निवडणूक विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेपेक्षा व सार्वजनिक सुटीच्या दिवशी काम करावे लागते. सदरील कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुटीचा मोबदला तसेच अतिरिक्त वेळेत केलेले कामाचा मोबदला देण्यात येत नाही. निवडणुकीचे काम कालमर्यादेत पुर्ण करणे बंधनकारक असते. त्यामुळे निवडणूक विभागातील कर्मचाऱ्यांना सुटीचे दिवशी तसेच कार्यालयीन वेळेनंतर काम करावे लागते. निवडणूकीचे काम राष्ट्रीय व अत्यावश्यक सेवेत येत असल्याने निवडणूक विभागातील वरीष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, अनुरेखक इ.वर्ग-३ आणि वर्ग-४ संर्गातील कर्मचाऱ्यांना दि.०१/५/२००९ पासुन अतिरिक्त कामाचा व सार्वजनिक सुटीच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला देण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीत मंजुरीस्तव सविनय सादर.

सुचक : खान मेहरून्नीसा खान, प्रशांत देसरडा

अनुमोदक : रविकांत गवळी, दत्ताभाऊ पाथ्रीकर, सौ.मोमीन सफिया फिरदौस

**ठराव :**

प्रस्ताव महानगरपालिका सार्वत्रिक/पोट निवडणुकीच्या कालावधीत निवडणूक विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर अतिरिक्त व सार्वजनिक सुटीच्या दिवशी काम करावे लागत असल्याने निवडणूक विभागातील वरीष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, अनुरेखक इ.वर्ग-३ आणि वर्ग-४ संर्गातील कर्मचाऱ्यांना दि.०१/०५/२००९ पासुन अतिरिक्त कामाचा मोबदला व सार्वजनिक सुटीच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जय जवान क्रिडा मंडळ, नेहरूनगर, कटकटगेट, औरंगाबाद ही संस्था समाजातील युवकांना क्रिडा विषयक जागरूकता निर्माण करून खेळाचे महत्व निर्माण करण्याचे कार्य करते. तसेच युवक व महिलांना रोजगार व स्वयंरोजगार संबंधी मार्गदर्शन करून रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्याचे काम करीत असून संस्थेची संलग्न असणरी पाकीजा महिला व बालविकास मंडळ ही संस्था महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून स्वावलंबी बनविण्याचे करण्याचे कार्य करते. जय जवान क्रिडा मंडळ या संस्थेने महानगरपालिकेचे कटकट गेट येथील खाजगा गरीबन नवाज हॉस्पीटलच्या खालची जागा दीर्घ मुदतीकरीता लिजवर/भाडेतत्वावर देण्याबाबत विनंती केलेली आहे. या माध्यमातुन महानगरपालिकेस चांगला महसूल प्राप्त होऊ शकतो तसेच विनावापर पडून असलेल्या जागेची देखभाल देखील चांगल्या प्रकारे होईल. म्हणून सदरील हॉस्पीटलच्या खालची रिकामी असलेली जागा या संस्थेस मनपाच्या प्रचलित अटी-शर्ती व नियमानुसार भाडे आकारणी करून दीर्घ मुदतीसाठी लिजवर/भाडेतत्वावर देण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : भगवान घडमोडे अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युवकांना क्रिडा विषयक जागरूकता निर्माण करून खेळाचे महत्व निर्माण करणे, युवक व महिलांना रोजगार व स्वयंरोजगार संबंधी मार्गदर्शन करून रोजगाराचे साधन उपलब्ध करून देणे, संस्थेची संलग्न असणरी पाकीजा महिला व बालविकास मंडळ ही संस्था महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून स्वावलंबी बनविण्याचे करण्याचे करणाऱ्या जय जवान क्रिडा मंडळ या संस्थेस अनेक वर्षापासून विनावापर पडून महानगरपालिकेचे कटकट गेट येथील खाजगा गरीबन नवाज हॉस्पीटलच्या खालची जागा मनपाच्या प्रचलित अटी-शर्ती व नियमानुसार भाडे आकारणी

करून दीर्घ मुदतीकरीता लिजवर/भाडेतत्वावर देण्यास दीर्घ मुदतीसाठी लिजवर/भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.28 नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींगचे कामासाठी र.रू.24.99 लक्ष चे अंदाजपत्रक संबंधीत विभागामार्फत तयार करण्यात आलेले असून मनपा निवडणूक आचारसंहिता व अतिक्रमणाची शक्यता ध्यानात घेता सदरचे काम तातडीने करून घेणे आवश्यक आहे. तरी सदरील काम मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक : प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. 28 नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींगचे काम करणेसाठी र.रू.24.99 लक्ष चे अंदाजपत्रकास अधीन राहून सदरचे काम तातडीने करून घेण्याकरीता मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२८ मो. नेहरूनगर येथील पुर्वी ५(२)(२) अन्वये मंजुर झालेल्या सिमेंट रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून गुत्तेदार श्री.सलीम मोहीयोद्यीन हे काम करीत आहे. उर्वरीत काम सुमारे ५ लक्षचे शिल्लक असून सदरील उर्वरीत काम मनपा अर्थसंकल्प मधील SCR-C-२ वरील काम नवीन खडी रस्ते शहरी भाग अ.क्र.१ त्रिमुर्तीनगर येथे डांबरीकरण तथा खडीकरण करणे आर्थिक तरतुद रू.५ लक्ष या तरतुदीतून उर्वरीत काम करण्यासाठी व काम करीत असलेल्या गुत्तेदाराकडून सदरील काम करून घेण्यासाठी मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : खान मेहरून्नीसा हमीद खान अनुमोदक : मोमीन सफिया फिरदौस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२८ मो. नेहरूनगर येथील पुर्वी ५(२)(२) अन्वये सुरू असलेल्या कामापैकी उर्वरीत काम मनपा अर्थसंकल्प मधील SCR-C-२ वरील काम नवीन खडी रस्ते शहरी भाग अ.क्र.१ त्रिमुर्तीनगर येथे डांबरीकरण तथा खडीकरण करणे आर्थिक तरतुद रू.५ लक्ष या तरतुदीतून उर्वरीत काम हे संबंधीत गुत्तेदाराकडून मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, समिती सभा ठराव क्र.276 दिनांक 29-12-2009 अन्वये मालमत्ता विभागातीशी संबंधित मंजुर झाला असून त्या खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यात यावी.

**01**.पिया मार्केट व्यापारी संकुल तळमजला रू.155/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.100/- प्रती चौ.मी. प्रती माह.

**02.** पिया मार्केट व्यापारी संकुल पहिला मजला रू.75/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.50/- प्रती चौ.मी. प्रती माह.

**03.** हर्षनगर येथील व्यापारी संकुल रू.50/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.30/- प्रती चौ.मी. प्रती माह.

**04.** नुपूर अपार्टमेंट रू.76/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.40/-प्रती चौ.मी. प्रती माह

**05.** कबाडीपूरा व्यापारी संकुल रू.155/- प्रती चौ.मी.प्रती माह ऐवजी रू.100/- प्रती चौ.मी.प्रती माह.

याप्रमाणे सुधारीत दरास मान्यता देवुन काही व्यापारी संकुलातील दुकाने बांधल्यापासून आजपर्यंत भाडेतत्वावर न गेल्याने आणि आजमितीस प्राप्त विनंती अर्जानुसार संबंधितास खालील दर्शविलेली दुकाने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार तीस वर्षासाठी आवश्यक त्या अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास तसेच दिलासा महिला गृह उद्योग या संस्थेस औरंगाबाद महानगरपालिकेच्या पिया मार्केट मधील तळमजल्यावरील दुकान क्र.26 ज्या धर्तीवर भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या लोटाकारंजा येथील व्यापारी संकुलावरील (1997 पासून) हॉल बांधल्यापासून आजपर्यंत रिक्त असल्याने सचिव, अल-खिद्मा महिला मंडळ, पडेगांव, औरंगाबाद यांना नाममात्र शुल्क रू.100/- प्रती माह प्रमाणे देण्यास तसेच खालील दर्शविलेल्या तक्त्यातील दुकाने संबंधित अर्जदारांच्या विनंती अन्वये मान्य दरानुसार भाडेत्वावर देण्यास मंजुरी द्यावी.

| अ. क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | दुकान क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. मध्ये | अर्जदाराचे नांव | प्रती चौ.मी. प्रती माह दर | प्रती माह भाडे रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | नुपूर अपार्टमेंट शेजारी गारखेडा | 07 | 18 | श्रीमती.लिला थावरे नाईक | रू.40/- | रू.720/- |
| 02 | नुपूर अपार्टमेंट शेजारी गारखेडा | 08 | 18 | श्रीमती.लिला थावरे नाईक | रू.40/- | रू.720/- |
| 03 | सादिया मागील व्यापारी संकुल | 04 | 5.79 | श्री.बाशीद कुरेशी मजिद कुरेशी | रू.30/- | रू.174/- |
| 04 | सादिया मागील व्यापारी संकुल | 05 | 5.85 | श्री.मो.नजीर मो.याकुब | रू.30/- | रू.176/- |
| 05 | सादिया मागील व्यापारी संकुल | 06 | 5.88 | श्री.शेख नजीर शेख बशीर | रू.30/- | रू.176/- |
| 06 | सादिया मागील व्यापारी संकुल | टेलीफोन बुथ | 9.13 | श्री.लईक खान आणि अमजद खान | रू.30/- | रू.274/- |
| 07 | क्रांतीचौक व्या.सं. | 07 | 18.50 | श्री.बिपीन संतोष मुगदीया | रू.85/- | रू.1573/- |
| 08 | कबाडीपूरा व्या.सं. | 03 | 24 | मोहमंद शकील मो.शरीफ | रू.100 | रू.2400/- |
| 09 | जय टॉवर्स | 21 | 13.725 | सुधाकर शंकरराव बागुल | रू.100 | रू.1373/- |

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : भगवान घडमोडे                                        अनुमोदक :श्रीमती खान मेहरून्नीसा खान

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती सभा ठराव क्र.276 दिनांक 29-12-2009 अन्वये मालमत्ता विभागातीशी संबंधित मंजुर झाला असून त्यात खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यात येते.

**01.**पिया मार्केट व्यापारी संकुल तळमजला रू.155/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.100/- प्रती चौ.मी. प्रती माह

**02.** पिया मार्केट व्यापारी संकुल पहिला मजला रू.75/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.50/- प्रती चौ.मी. प्रती माह

**03.** हर्षनगर येथील व्यापारी संकुल रू.50/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.30/- प्रती चौ.मी. प्रती माह

**04.** नुपूर अपार्टमेंट रू.76/- प्रती चौ.मी. प्रती माह ऐवजी रू.40/-प्रती चौ.मी. प्रती माह

**05.** कबाडीपूरा व्यापारी संकुल रू.155/- प्रती चौ.मी.प्रती माह ऐवजी रू.100/- प्रती चौ.मी.प्रती. माह.

यापमाणे सुधारीत दरास मान्यता देवुन काही व्यापारी संकुलातील दुकाने बांधल्यापासून आजपर्यंत भाडेतत्वावर न गेल्याने आणि आजमितीस प्राप्त विनंती अर्जानुसार संबंधितास खालील दर्शविलेली दुकाने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार तीस वर्षासाठी आवश्यकत्या अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास तसेच दिलासा महिला गृह उद्योग या संस्थेस औरंगाबाद महानगरपालिकेच्या पिया मार्केट मधील तळमजल्यावरील दुकान क्र.26 ज्या धर्तीवर भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या लोटाकारंजा येथील व्यापारी संकुलावरील (1997 पासून) हॉल बांधल्यापासून आजपर्यंत रिक्त असल्याने सचिव, अल-खिद्‌मा महिला मंडळ, पडेगांव, औरंगाबाद यांना नाममात्र शुल्क रू.100/- प्रती माह प्रमाणे देण्यास तसेच खालील दर्शविलेल्या तक्त्यातील दुकाने संबंधित अर्जदारांच्या विनंती अन्वये मान्य दरानुसार भाडेत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | दुकान क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. मध्ये | अर्जदाराचे नांव | प्रती चौ.मी. प्रती माह दर | प्रती माह भाडे रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | नुपूर अपार्टमेंट शेजारी गारखेडा | 07 | 18 | श्रीमती.लिला थावरे नाईक | रू.40/- | रू.720/- |
| 02 | नुपूर अपार्टमेंट शेजारी गारखेडा | 08 | 18 | श्रीमती.लिला थावरे नाईक | रू.40/- | रू.720/- |
| 03 | सादिया मागील व्यापारी संकुल | 04 | 5.79 | श्री.बाशीद कुरेशी मजिद कुरेशी | रू.30/- | रू.174/- |
| 04 | सादिया मागील व्यापारी संकुल | 05 | 5.85 | श्री.मो.नजीर मो.याकुब | रू.30/- | रू.176/- |
| 05 | सादिया मागील व्यापारी संकुल | 06 | 5.88 | श्री.शेख नजीर शेख बशीर | रू.30/- | रू.176/- |
| 06 | सादिया मागील व्यापारी संकुल | टेलीफोन बुथ | 9.13 | श्री.लईक खान आणि अमजद खान | रू.30/- | रू.274/- |
| 07 | क्रांतीचौक व्या.सं. | 07 | 18.50 | श्री.बिपीन संतोष मुगदीया | रू.85/- | रू.1573/- |
| 08 | कबाडीपूरा व्या.सं. | 03 | 24 | मोहमंद शकील मो.शरीफ | रू.100 | रू.2400/- |
| 09 | जय टॉवर्स | 21 | 13.725 | सुधाकर शंकरराव बागुल | रू.100 | रू.1373/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५९ अंतर्गत असलेल्या पटेल कॉलनी येथे पोलसहीत उर्जा बचत पथदिवे लावणे आवश्यक आहे. या ले-आऊटमधून मनपाने नवीन रस्ता तयार केलेला असून या रस्त्यावर पथदिवे तातडीने लावणे गरजेचे आहे. या कामाकरीता संबंधीत विभागाकडून २.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.महापौर यांनी आपत्कालीन निधी मधून रक्कम उपलब्ध करून दिलेली आहे. सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५९ अंतर्गत असलेल्या पटेल कॉलनी ले-आऊटमधून मनपाने नवीन तयार केलेल्या रस्त्यावरपोलसहीत उर्जा बचत पथदिवे तातडीने लावणे गरजेचे र.रू. २.०० लक्षचे अंदाजपत्रक व मा.महापौर यांनी आपत्कालीन निधी मधून रक्कम उपलब्ध करून दिल्यानुसार सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं. प्रां. मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-ड प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्रीमती मोमीन सफिया : महिला बाल कल्याण समितीच्या माध्यमातून शिलाई मशीनचे टेंडर होवून वाटप होते त्याची कार्यवाही तात्काळ व्हावी.

मुख्यलेखधिकारी :शिलाई मशीनसाठी ५ निविदा आल्या पहिल्या पॉकेटमध्ये ३ व्हॅलीड टेंडर होते. दोन निविदाचे कागदपत्र कमी होते टेंडर स्वीकारावे म्हणून मा.आयुक्ताकडे त्यांनी ही विनंती केली सादर करण्यासाठी दोन दिवसाची मुदत दिली त्यानंतर सॅम्पल आयटीआय कडे तपासणी साठी पाठवून त्याचा अहवाल आल्यानंतर या बाबत अंतिम निर्णय होईल.

मा.सभापती : उशीर का झाला.लेखा विभागाकडे केंव्हा आले.

मुख्यलेखाधिकारी :निविदा काढणे व स्विकारणेचे काम लेखा विभागाचे असते या संबधीची संचिका लेखा विभागात येण्यास उशीर झाला टेंडर केंव्हा झाले माहिती सध्या नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :वर्षाच्या शेवटीच का अगोदर का कामे होत नाही.

मा.सभापती :निविदेची तारीख, केंव्हा काढली आतापर्यंत का प्रलंबीत होते मागिल वर्षी केंव्हा कार्यवाही झाली संचिका मागवून माहिती दयावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :इतर विभागा प्रमाणे या विभागाची चौकशी करण्यात यावी.

मा.सभापती :शिलाई मशीन वाटप करण्या बाबत स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले.मुख्यलेखाधिकारी यांनी पुर्ण माहिती दिली नाही.सभागृहाच्या भावना लक्षात घेता या प्रोसेसला उशीर का झाला या प्रकरणाची मुख्यलेखा परीक्षक व उपआयुक्त (सिडको) यांनी दोन दिवसात चौकशी करून अहवाल सभापती स्थायी समितीकडे सादर करावा.

श्री.रविकांत गवळी :स्थायी समिती सभापती व स.सदस्यांचा कार्यकाळ कोणत्या तारखेपर्यत आहे.

मा.सभापती : कृपया नगर सचिव यांनी माहिती द्यावी.

नगरसचिव :मुंबई प्रांतिक महानगपालिका अधिनियम १९४९ चे उक्त कलम ६ नुसार प्रत्येक महापालिकेचे तिचे अगोदर विसर्जन करण्यात आले नाही तर तिच्या पहिल्या सभेसाठी नेमून दिलेल्या कालावधीपर्यत चालू राहिल आणि त्यापेक्षा अधिक काळ चालू राहणार नाही. कलम ६ अ प्रमाणे पालिका सदस्यांचा पदावधी महापालिकेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल कलम २० नुसार महापालिकेने सार्वत्रिक निवडणुकीनंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ सदस्यांची समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम २ मध्ये उल्लेख केलेली महापालिकेची पहिली सभा ज्या महिण्यात

भरेल त्या महिण्यात पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील परंतु सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतील तेंव्हा स्थायी समितीचे जे सदस्य पदावर असतील ते सर्व पोट कलम २ अन्वये नवीन समीतीची निवडणूक झाल्यावर आपल्या पदावरून निवृत्त होतील अशी तरतूद आहे.

मा.सभापती : सदस्य असले पाहिजे असे बंधन नाही.

श्री.भगवान घडमोडे :महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर कामगार संघटनेचे उपोषण चालू असून काही कर्मचा-याचे सेवा पट भरण्याचे बाकी आहे अनेक वेळा त्यांनी निवेदन दिले कार्यवाही झाली नाही.६ व्या वेतन आयोगानुसार पगारात मोठी वाढ झाली ज्याचे सेवापट भरण्याचे बाकी आहे त्यांना पगार कमी मिळतो या बाबत त्वरीत कार्यवाहीचे आदेश द्यावेत.

श्री.रविकांत गवळी :प्रशासनाच्या अधिकारात काही दुरूस्त्या वगैरे करता येत असेल त्या कराव्या कार्यवाही करावी.

श्री.प्रशांत देसरडा : उप आयुक्त (म.) श्री.घुगे साहेबांना सांगू नका. श्री.अय्युब साहेबांना सांगा.

श्री.भगवान घडमोडे :रोटेशन नुसार भरती केली नाही असे त्यांना सांगितले जाते. ही प्रशासनाची चुक आहे. शासनाचे जे आदेश येतील तेंव्हा काय निर्णय घ्यायचा तो घेता येईल.

मा.सभापती :ज्या कर्मचा-यांचे सेवापुस्तक भरलेले नाही ते नियमानुसार भरण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी. स.सदस्यांचे व प्रशासनाचे ऐनवेळचे सर्व विषय मंजूर.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

१५/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२५) इतिवृत्त

**दुरूस्ती सूचना**

दिनांक २७/४/२०१०.

दिनांक १५.२.२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभा कार्यक्रम पत्रिका क्र.२५ च्या इतिवृत्ताचे पृष्ठ क्र. २ वर विषय क्र.३९१ टंकलिखित केलेला आहे. परंतु अनवधानाने ठराव टंकलिखित करण्याचे राहून गेलेले आहे. कृपया सदरील विषय क्रमांक ३९१ चा "प्रस्ताव व ठराव" खालील प्रमाणे दुरूस्ती वाचावी.

**विषय क्र. ३९१ :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रा तर्फे खालील दोन ग्रंथ (प्रत्येकी एक हजार प्रती) छपाई करण्यात आल्या आहेत.

१) धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन - डॉ.प्रदिप आगलावे

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुल्यात्मक राजकारण- डॉ.आर.के.क्षीरसागर

सदर ग्रंथाच्या छपाईवर रू.६,५८,१८८/- खर्च झाला आहे. ग्रंथ छपाईचा उद्देश नफा कमविणे नसून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे हा आहे. त्यामुळे सामान्य वाचकास परवडतील असे दर प्रती ग्रंथ रू.१५०/- असावा. तसेच ग्रंथ प्रकाशनाच्या वेळी लेखकांना प्रत्येकी एक व व्यासपिठावरील मान्यवरांना व वृत्तपत्रांना विनाशुल्क सुमारे १०० प्रती आदरपूर्वक देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच वेळोवेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मा.मंत्री, देश, विदेशातील प्रख्यात साहित्यीक भेट देतात त्यांना सन्मानपुर्वक ग्रंथ सप्रेम भेट (विनामुल्य) देण्यात यावेत.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रा तर्फे छपाई करण्यात आलेल्या धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुल्यात्मक राजकारण या ग्रंथांसाठी दर प्रती ग्रंथ रू.१५०/- तसेच ग्रंथ प्रकाशनाच्या वेळी लेखकांना प्रत्येकी एक व व्यासपिठावरील मान्यवरांना व वृत्तपत्रांना विनाशुल्क सुमारे १०० प्रती आदरपूर्वक देण्यास आणि वेळोवेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मा.मंत्री, देश विदेशातील प्रख्यात साहित्यीक भेट देतात त्यांना सन्मानपुर्वक ग्रंथ सप्रेम भेट म्हणून विनामुल्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद